म. टा. पान नं. ०१ दि. २०/१२/२२

# सीमाप्रश्नी पुन्हा संघर्ष

## आघाडीच्या नेत्यांचा कर्नाटकातील प्रवेश रोखला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या बेळगाव येथील महामेळाव्याला जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या महाविकास आघाडीच्या कोल्हापुरातील नेते-पदाधिकाऱ्यांची कोगनोळी टोलनाक्यावर सोमवारी कर्नाटक पोलिसांशी झटापट झाली. या पदाधिकाऱ्यांना कर्नाटकात प्रवेश करण्यास मज्जाव करून पोलिसांनी लाठीमार केला आणि त्यांना ताब्यातही घेतले.

कर्नाटक सरकारकडून सीमावासीयांवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाराष्ट्र एकीकरण समितीने सोमवारी बेळगाव येथे महामेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात सामील होण्यासाठी व सीमाबांधवांना पाठिंबा दर्शविण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे नेते बेळगावकडे निघाले होते. यामध्ये आमदार हसन मुश्रीफ, शिवसेना जिल्हाप्रमुख विजय देवणे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भैया माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष माजी महापौर आर. के. पोवार, काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सुनील मोदी सहभागी झाले होते.

कोगनोळी नाक्यावर कर्नाटक पोलिसांनी बॅरिकेड्स लावून नाकाबंदी केली होती. या ठिकाणी एक हजारापेक्षा जास्त पोलिसांचा बंदोबस्त होता. पोलिसांचे कडे झुगारून कर्नाटकच्या दिशेने जाणाऱ्या महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना ➤ पान ५वर



महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर महाविकास आघाडीच्या नेत्यांना कर्नाटक पोलिसांनी सोमवारी रोखले.

### कर्नाटकात मेळाव्याला परवानगी नाकारली

**बेळगाव :** कर्नाटक विधीमंडळाच्या अधिवेशनाला विरोध करण्यासाठी आयोजित महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महामेळाव्याला कर्नाटक पोलिसांनी ऐनवेळी परवानगी नाकारली. मेळाव्याच्या परिसराला पोलिसांनी गराडा घालून व्यासपीठ काढण्यास भाग पाडले; तसेच समितीच्या ५० जणांना अटक केली. या दडपशाहीच्या निषेधार्थ मराठी भाषिकांनी वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलन केले.

## कर्नाटक सरकारच्या निषेधाचा 'आवाज'



### पहिल्याच दिवशी सीमावाद पेटला

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

उपराजधानीत थंडी वाढत असताना विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधकांनी सीमावाद पेटविला. सोमवारी विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. 'कर्नाटक सरकारचा धिक्कार असो, विदर्भाला न्याय मिळालाच पाहिजे, महाराष्ट्रद्रोहाला संरक्षण देणारे सरकार हाय हाय, ईडी सरकारचा धिक्कार असो' अशा घोषणा देत विरोधी पक्षातील नेत्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

'पन्नास खोके, एकदम ओके' असे फलक घेऊन विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, जितेंद्र आव्हाड, एकनाथ खडसे, राजेश टोपे, मनीषा कायंदे, आदिती तटकरे, राजू कारेमोरे, ॲड. अभिजित वंजारी आदींसह महाविकास आघाडीचे नेते विधानभवनाच्या पायऱ्यांवर आले. तेथे सत्ताधाऱ्यांविरुद्ध तुफान घोषणाबाजी झाली. 'सीमाप्रांतात ➤ पान ५वर

## 'फेक ट्वीट'मागे राजकीय पक्ष



### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

'सीमाप्रश्नाचा वाद निर्माण करणारे कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांच्या 'फेक ट्वीट'मागे कोणता पक्ष आहे, याची माहिती आम्हाला मिळाली आहे. ती माहिती लवकरच समोर आणली जाईल', असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी विधानसभेत कोणत्याही पक्षाचे नाव न घेता दिला. सीमाप्रश्नावर राजकारण करू नका, असे आवाहन त्यांनी विरोधकांना केले.

शिंदे यांनी विधिमंडळातील उत्तरात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर नेम धरला. 'गेल्या अडीच वर्षात सीमाभागातील योजना बंद करण्यात आल्या. मात्र, आमच्या सरकारने त्या सुरू केल्या आहेत', असे शिंदे यांनी सांगितले. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या आंदोलकांना कर्नाटक सरकारने अटक केली. त्यांना सोडविण्यासाठी सरकार कार्यवाही करेल, असे त्यांनी सांगितले. तर सीमावर्ती भागातील गावे आणि मराठी बांधवांच्या पाठीशी सरकार उभे आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सर्व सीमावर्ती भागातील गावांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम हाती घेणार असल्याच त्यांनी सांगितले. ➤ आम्ही पाठीशी...५

दि. २०/१२/२२

# सीमाप्रश्नी पुन्हा संघर्ष

(पान एकवरून)

पोलिसांनी मागे रेटले. कडे तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या नेत्यांवर लाठीमार केला. त्यामुळे संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या. 'आम्ही शांततेच्या मार्गाने कर्नाटकात निघालो होतो. मात्र, पोलिसांनी दडपशाही केली. एका आमदारासोबत अशी वर्तणूक होत असेल, तर सीमावासीयांवर किती अन्याय अत्याचार होत असेल', असे आमदार मुश्रीफ म्हणाले. दरम्यान, कर्नाटक सरकारच्या निषेधार्थ सायंकाळी मराठा महासंघाच्या वतीने कोल्हापुरातील शिवाजी चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली.

# कर्नाटक सरकारच्या निषेधाचा 'आवाज'

(पान एकवरून)

महाराष्ट्रातील लोकांची धरपकड सुरू आहे. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारची बाजू स्पष्ट करावी. कर्नाटकमध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीची बैठक होती. त्यावेळी कर्नाटक सरकारने धरपकड सुरू करून मराठी लोकांवर अन्याय केला. शिवसेनेचे खासदार धैर्यशील माने हे बेळगावमध्ये गेले असता जिल्हा प्रशासनाने त्यांना रोखत प्रवेशबंदीचा आदेश बजावला. या घटनेचा आम्ही निषेध करतो', असे पवार म्हणाले.

## 'लोकशाही विकायला निघालेले सरकार'

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी पत्रपरिषदेत खोक्यांबाबत विचारलेल्या प्रश्नाला 'खोक्यांचा थर तयार होईल' असा खोचक टोला विरोधी पक्षाला लगावला होता. त्यावर पटोले यांनी खोक्यांच्या माध्यमातून हे सरकार विकायला निघाले आहेत, असा टोला लावला. त्याशिवाय महापुरुषांबाबत केलेल्या वादग्रस्त विधान केल्याबद्दल चंद्रकांत पाटील यांच्यावर कारवाई का झाली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# 'बोम्मई यांच्याकडून शहा यांचा अपमान'

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर शांतता प्रस्थापित करण्याचे निर्देश धुडकावून लावत कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा अवमान केला आहे, असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी सोमवारी लोकसभेत केला.

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनासाठी उभारलेला मांडव तोडण्यात आला. नेहमीप्रमाणे दिली जाणारी परवानगीही नाकारण्यात आली. तसेच महाराष्ट्र एकीकरण समितीच्या लोकांना अटक करण्यात आली. हा राज्यघटनेवर हल्ला आहे, अशी टीका सावंत यांनी केली.

# 'लोकायुक्त' विधेयकामुळे अण्णांचे समाधान

**म. टा. प्रतिनिधी, नगर**

तब्बल बारा वर्षांच्या पाठपुराव्यानंतर राज्यात लोकायुक्त कायद्याचे विधेयक विधिमंडळात येत आहे. यासाठी पाठपुरावा करीत असलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी समाधान व्यक्त केले असून आता यासंबंधी राज्यभर प्रबोधन करणार असल्याचे जाहीर केले.

लोकायुक्त विधेयक नागपूरमध्ये सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात ठेवण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर हजारे यांनी सोमवारी राळेगणसिद्धी येथे पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'या कायद्यासाठी आम्ही तब्बल बारा वर्षे पाठपुरावा केला. फडणवीस यांच्या काळात मला आंदोलन करावे लागले. ते राळेगणला आले. आपल्या निर्णय न घेण्यामुळे एवढ्या लोकांना त्रास होत आहे हे त्यांना खटकले त्यांनी तेथेच लेखी आश्वासन दिले व आता हा कायदा प्रत्यक्षात येत आहे,' असेही हजारे म्हणाले.

# तालिकाध्यक्ष यादीत ठाकरे गट बेदखल



**मुंबई :** विधानसभेच्या तालिका सभाध्यक्षांच्या यादीतून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला बेदखल करण्यात आले आहे. विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सोमवारी विधानसभा तालिका सभाध्यक्षांच्या नावाची घोषणा केली. यात ठाकरे गटाच्या एकाही सदस्यांचे नाव नाही. तालिका सभाध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे संजय शिरसाट, भाजपचे समीर कुणावार, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील भुसारा आणि काँग्रेसच्या सुभाष धोटे यांच्या नावांची घोषणा नार्वेकर यांनी सभागृहात केली.

# 'विराट मोर्चा'चा व्हिडीओ; राऊतांच्या ट्वीटमुळे वाद

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या मोर्चाच्या निमित्ताने केलेल्या ट्वीटमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. या ट्वीटमध्ये महाविकास आघाडीच्या मोर्चाऐवजी मराठा क्रांती मोर्चाने मुंबईत काढलेल्या मोर्चाचा व्हिडीओ असल्याने वाद पेटला आहे. मराठा क्रांती मोर्चाने त्यांच्याविरोधात कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, 'हा महाविकास आघाडीचा मोर्चा आहे, असे मी कुठेही म्हटले नाही', असे स्पष्टीकरण राऊत यांनी दिले आहे.

महाविकास आघाडीने काढलेल्या मोर्चाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'नॅनो मोर्चा' असे संबोधले. त्यांना उत्तर देताना राऊत यांनी एक व्हिडीओ ट्वीट केले. 'देवेंद्र फडणवीस ज्यास नॅनो मोर्चा म्हणून हिणवत आहेत तो हाच! देवेंद्र जी..हे वागणे बरे नाही' अशी टीका यामध्ये करण्यात आली होती. मात्र राऊत यांनी ट्वीट केलेला व्हिडीओ मराठा क्रांती मोर्चाचा असल्याचा दावा संघटनेने केला होता. राऊत यांच्याविरोधात तक्रार दाखल झाली आहे.

दि.२०/१२/२२

(७) लोकसत्ता पृ.५ कॉ.०१

### वाहनात महिलेचा विनयभंग प्रकरण

# चार प्रवाशांची ओळख पटली

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरार येथील महामार्गावर चालत्या वाहनातील महिलेच्या विनयभंग प्रकरणातील एकूण चार प्रवाशांची ओळख पटविण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. न्यायालयासमोर त्यांचे जबाब सादर करण्यात आले आहे. मात्र महिलेच्या तक्रारीत आणि या सहप्रवाशांच्या जबाबात विसंगती असल्याने नेमकी काय घटना घडली ते अद्याप स्पष्ट झालेले नाही.

शनिवार १० डिसेंबर रोजी वाडा येथे राहणारी २० वर्षीय महिला सकाळी पेल्हार येथून वाड्याला घरी जाण्यासाठी निघाली होती. तिच्या सोबत तिची १० महिन्यांची मुलगी होती. तिने पेल्हार येथून खासगी इको गाडी पकडली होती. ती मुलीसह चालकाच्या शेजारील आसनावर बसली होती.

या वाहनात चालक आणि अन्य पाच प्रवासीही होते. वाहन काही अंतर पुढे जाताच तिची मुलगी खिडकीतून खाली पडली आणि पाठोपाठ या महिलेनेही उडी घेतली. या प्रकारात चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला होता.

वाहनातील चालक आणि प्रवाशांनी माझा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला म्हणून स्वतःला वाचविताना ही घटना घडली असा खळबळजनक आरोप या महिलेने केला होता. तिच्या तक्रारीनुसार मांडवी पोलीस ठाण्यात चालक आणि तीन प्रवाशांविरोधात हत्या आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून हा तपास गुन्हे शाखेकेड वर्ग करण्यात आला आहे,

गुन्हे शाखेने वाहनातील चार प्रवाशांची ओळख पटवली आहे. मात्र त्यांच्यावर थेट गुन्हा दाखल न करता त्यांचे जबाब न्यायालयात सादर केले आहेत. मात्र तक्रारदार महिला आणि सहप्रवाशांच्या जबाबात विसंगती असल्याचे आढळून आले आहे. नेमका काय प्रकार घडला ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाहनात किती प्रवासी होते त्याबाबतही संभ्रम आहे.या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

(७) लोकसत्ता पृ.५ कॉ.०१

# शासकीय जागेवर अतिक्रमण

**वसई:** नायगाव पूर्वेच्या सर्व्हे क्रमांक २०९ / अ १ या शासकीय जागेवर भूमाफियांमार्फत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरू होता. याप्रकरणी महसूल विभागाने दिलेल्या तक्रारीवरून वालीव पोलीस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्य रस्त्यालगत ही जागा असून या जागेवर भूमाफियामार्फत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी महसूल विभागाने कारवाई केली होती. त्यानंतरही या जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न भूमाफियांनी सुरू केला होता. रविवारी महसूल विभागाचे पथकाने प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली. यावेळी या जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून आले. याप्रकरणी तलाठी सजा जूचंद्र हेमंत मुळाने यांनी वालीव पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. वालीव पोलिसांनी मिथिलेश पाठक, तेजबहाद्दर शारदाप्रसाद सिंह, प्रमोद तिवारी या तिघांविरोधात शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

(७) लोकसत्ता पृ.५ कॉ.०१.

# विजेवर चालणाऱ्या दुचाकीला आग

**विरार :** विरारमध्ये विरार पूर्व राजो पाटील इमारत, फुलपाडा रिक्षा थांबा येथे विजेवर (इलेक्ट्रिक) चालणाऱ्या दुचाकीला आग लागल्याची घटना समोर आली आहे. रात्री ८:१५ च्या सुमारास ही घटना घडली आहे.

स्कुटर मालक हितेश पाटील हे शनिवारी रात्रीच्या सुमारास दुचाकी चालवून आले होते. त्यानंतर त्यांनी ती पार्किंगमध्ये उभी केली आणि घरी गेले. अचानक या दुचाकीने पेट घेतला. काही क्षणातच दुचाकी जळून खाक झाली. या अगोदर नालासोपारा आणि वसई, विरार येथे घटना समोर आल्या आहेत.

दि. २०/१२/२१

(८) लोकसत्ता पृ.क्र.०३

# भाडेकराराची नोंद न केल्यास तुरुंगवास

## पोलीस आयुक्तालयाचे घरमालक-भाडेकरूंसाठी परिपत्रक

लोकसत्ता प्रतिनिधी

**विरार :** वसई विरार आणि मिरा भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणात मालमत्ता भाडे करारावर दिल्या जात आहेत. पण हे भाडेकरार पोलीस दप्तरी नोंद केले जात नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक राज्यातील गुंड, दरोडेखोर, चोर, नक्षलवादी शहरात भाड्याने घरे घेऊन राहत असल्याची माहिती समोर आल्याने मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाने भाडे करार नोंदणी सक्तीची केली आहे. यामुळे आता कोणत्याही प्रकारच्या मालमत्ता भाड्याने देण्यासाठी त्याची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.



### ...तर फौजदारी कारवाई

यासंदर्भातील एक परिपत्रक पोलीस आयुक्तालयाने काढले आहे. मालमत्ता भाड्याने देताना पोलीस नोंदणी करून व्यवहार करण्याचे आवाहन त्यात करण्यात आले आहे. जर नोंदणी न करता भाडे तत्वावर मालमत्ता दिल्यास घर मालक, भाडेकरू, सोसायटी सदस्य, दलाल यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी परिपत्रकात दिली आहे.

वसई-विरार मध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे भूमाफियांकडून वसवली जात आहेत. त्यात स्वस्तात घरे मिळत असल्याने अनेक गुंतवणुकदार ती विकत घेतात. आणि दलालांमार्फत त्यात भाडेकरुंचा भरणा करतात. गुंतवणुकदार इतर दुसऱ्या ठिकाणी राहत असल्याने अनेक वेळा १०० रुपयाच्या मुद्रांकावर व्यवहार केले जातात. याची पोलीस दप्तरी नोंद केली जात नाही. यामुळे भाडेकरुची कोणतीही माहिती पोलिसांना मिळत नाही.

पोलिसांनी भाडेकरार स्थानिक पोलीस ठाण्यात नोंदणीकरण्याची सक्ती केली आहे. पण अनेक दलाल हे करत नसल्याचे समोर आले आहे. त्यात वसई-विरारमध्ये इस्टेट एजंटचा व्यवसाय करणारे, मागील काही वर्षात दोन हजारहून अधीक बनावट दलाल बाजारात निर्माण झाले आहेत. ते अनेक गैरधंदे करणाऱ्यांना अनधिकृत इमारतींत भाड्याने घरे मिळऊन देत असल्याची माहिती ॲड. दिनेश आदमाने यांनी दिली.

(९) लोकसत्ता पृ.क्र.०२

# वसईत आठवडी बाजारातील फलकांची नासधूस

**वसई :** आठवडी बाजारात विक्रेत्यांच्या होणाऱ्या आर्थिक लुटीला लगाम घालण्यासाठी पालिकेने बाजाराच्या ठिकाणी दरफलक लावले होते. हे दरफलक अज्ञात व्यक्तीकडून फाडून टाकण्याचा प्रकार समोर आला आहे.

वसई विरार शहरात पापडी, मांडवी, कामण, विरार, जूचंद्र, नायगाव, नालसोपारा यासह विविध ठिकाणी आठवडी बाजार भरतात. या ठिकाणी विविध प्रकारचे साहित्य घेऊन विक्रीला बसतात त्यांच्याकडून पालिका बाजार कर वसूल करते. या बाजार कर वसुलीसाठी पालिकेने ठेकेदारांना ठेके दिले आहेत. परंतु काही ठेकेदार निर्धारित रकमेपेक्षा अधिकचे पैसे घेतले जात होते. यामुळे सर्वसामान्य विक्रेत्यांची आर्थिक लूट सुरू होती.



याबाबत पालिकेकडे अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन पालिकेने प्रत्येक बाजाराच्या ठिकाणी बाजार कर निर्धारित केलेले दरफलक लावण्याचे काम सुरू केले होते.

नुकताच प्रभाग समिती आय येथील आठवडे बाजारात लावण्यात आलेला दरफलक अज्ञात व्यक्तींनी फाडून टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. अचानकपणे हा दरफलक फाडून दिला असल्याने ठेकेदारांकडूनच असे कृत्य केले गेले असावे असा संशय नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे. या कृतीबद्दल नागरिकांनी संताप व्यक्त केला.

दि. २०/१२/२२

# नवीन वर्षात भाईंदर-दहिसर लिंक रोडचे काम

## वाहतूक कोंडीतून सुटका; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जानेवारीत भूमिपूजन

भाईंदर, ता. १९ (बातमीदार) : बहुप्रतिक्षित भाईंदर-दहिसर लिंक रोडचे काम नव्या वर्षात सुरू होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन पुढील महिन्यात केले जाणार आहे. या रस्त्यामुळे भाईंदर पश्चिमेकडून अत्यंत कमी वेळात, तसेच टोल न भरता थेट मुंबई गाठणे शक्य होणार आहे.



### असा आहे प्रस्तावित मार्ग

भाईंदर-दहिसर लिंक रोडच्या एकूण मार्गापैकी दीड किलोमीटरचा रस्ता मुंबईच्या हद्दीत तर सुमारे साडे तीन किलोमीटरचा रस्ता मिरा-भाईंदरच्या हद्दीत आहे. भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापासून हा रस्ता सुरू होणार आहे. या रस्त्यासाठी १८०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. कांदळवन परिसर असलेल्या भागात उन्नत मार्ग बांधण्यात येणार आहे.

भाईंदरहून मुंबईत रस्त्याने जायचे असल्यास सात किलोमीटरचा वळसा घालून दहिसर चेकनाका गाठावा लागतो. पण हा महामार्ग वर्दळीचा असल्याने टोलनाक्याजवळ मोठी वाहतूक कोंडी होते. चेकनाका ओलांडण्यासाठी अनेकवेळा पाऊण ते एक तासाचा वेळ लागतो. त्यामुळे भाईंदरहून मुंबईला जाण्यासाठी भाईंदर पश्चिमेकडून पर्यायी मार्ग सुचविण्यात आला होता. पण याठिकाणी कांदळवन असल्याने पर्यावरण, महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन यांची परवानगी तसेच रस्त्याचे रेखांकनातील बदल यात बराच काळ गेला. मुंबई महापालिका हा मार्ग बांधून देणार आहे. त्यानुसार त्याची निविदा प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी गेल्या आठवड्यात आयोजित केलेल्या संस्कृती मिरा-भाईंदर आर्ट फेस्टिवल कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मार्गाचे भूमिपूजन लवकरच करण्यात येणार असल्याचे घोषित केले होते. त्यानुसार जानेवारी महिन्यात रस्त्याचे भूमिपूजन केले जाईल, अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

# जंजिरे-धारावी किल्ल्यावर मद्यपान; दोघांवर गुन्हा दाखल

भाईंदर, दि. १९ (सा.वा.) - भाईंदर पश्चिमेला असलेल्या जंजिरे-धारावी किल्ल्यावर मद्यपान करणाऱ्या दोघांवर उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किल्ल्यावर मद्यपान करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे पोलिसांनी या भागातील गस्त वाढवली आहे.

जंजिरे-धारावी किल्ल्यावर व आजूबाजूच्या परिसरात वारंवार मद्यपान अणि अमलीपदार्थ सेवन करणाऱ्या गर्दुल्ल्याचा किल्ल्यावरचा वावर थांबत नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी शिवप्रेमींकडून केली जात आहे.रविवारी रात्री दहा, बारा व्यक्ती किल्ल्यावर बसून मद्यपान करत असल्याची तक्रार शिवप्रेमींनी पोलिसांकडे केली.पोलिसांनी याठिकाणी धाव घेत मद्यपींना ताब्यात घेतले. वारंवार अशा घटना घडत असताना महापालिका प्रशासन, पोलीस प्रशासन यांचा अंकुश नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. त्यांची चौकशी केली असता दोघे मद्यपान करत असल्याचे आढळून आले. त्यांच्यावर उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काशिमीरामध्ये १५ लाखांचा गुटखा जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट १ ने शुक्रवारी काशिमीरा येथील मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील हॉटेल फाउंटनजवळ एक ट्रक अडवून १५ लाखाचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. चालक-सलमान हुसेन पठाण (२६) आणि ट्रकचा क्लिनर इसार अली (३५) यांना अटक केली आहे.

काशिमिरा गुन्हे शाखेला गुटख्याची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून पथकाने ट्रक अडवून त्याची झडती घेतली असता त्यांना शेकडो पान-मसाला आणि सुगंधित तंबाखूजन्य पदार्थाच्या पिशव्या व गुटख्याचे बॉक्स आढळून आले. हा सर्व गुटखा जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत जवळपास १५ लाख आहे. तसेच गुटखा वाहतूक करणारा २५ लाख रुपये किमतीचा ट्रकही जप्त करण्यात आला आहे.

गुटख्याने भरलेला ट्रक गुजरातमधील सुरत येथून मुंबईतील वडाळा येथे जात होता, असे पोलिसांनी सांगितले. ट्रकचा मालक आणि गुटखा सप्लायर हे फरार असून चालक व क्लिनर यांना अटक केली आहे. या चौघावर काशिमीरा पोलिस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटख्याची बेकायदेशीरपणे वाहतूक आणि विक्री मुंबई व आसपासच्या परिसरामध्ये सुरू आहे. गुटख्याची तस्करी करण्यासाठी मोठी टोळी सक्रिय आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत आहे. अन्न व औषध प्रशासन विभाग, पोलीस बेकायदेशीर गोष्टींकडे डोळेझाक करत असल्याचे दिसून येते. पुढील तपास काशीमिरा पोलीस करत आहे.

# विनापरवानगी रेतीवाहतूक करणाऱ्यावर गुन्हा

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरून विनापरवानगी रेती वाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांवर कारवाई करण्यात आली असून ८ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मीरा भाईंदरमधील उत्तन, घोडबंदर व नवघर या ठिकाणी अनधिकृत रेती काढून त्याची विक्री करण्यात येते. याकडे महसूल विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. तसेच शहरात अवैध माती भराव व उत्खनन करून रेती, माती, डोंगर फोडून मुरूम व दगड यांची सीआरझेड व इको सेन्सेटीव्ह झोन भागातून वाहतूक करण्याचे प्रकार वारंवार सुरूच आहे. अनेकवेळा अवैध धंदे करणाऱ्यावर पोलिसांकडून कारवाई केली जाते. काशिमिरा येथील दोडिया पेट्रोलपंप येथे विनापरवानगी वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई करण्यात आली आहे. या ट्रकमध्ये तीन ब्रास गौण खनिज (रेती) अनधिकृतपणे वाहतूक करीत असताना सापडला. त्यानंतर पोलिसांनी वाहनांवर आणि चालक, मालक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करून आठ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, मीरा भाईंदर परिमंडळ -१, काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय पवार, पोलीस हवालदार रुपेश तागड, उमेश पवार यांनी केली आहे.

दि. २०/१२/२२

लोकमत पृ.भाग नं.०१

# डिजिटल फलकावर झळकले अपशब्द

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : आमदार गीता जैन यांच्या निधीतून भाईदर पूर्वेच्या बंदरवाडी-नवघर नाक्यावर उभारलेल्या हायमास्ट दिव्यांच्या ठिकाणी लावलेल्या डिजिटल फलकावर अपशब्द झळकू लागल्या प्रकरणाचा तपास नवघर पोलिस करत आहेत.

आमदार जैन यांच्या स्थानिक आमदार निधीतून बंदरवाडी नाका येथे हायमास्ट लाइटचा खांब उभारला आहे. त्याचे उद्घाटनाला जैन यांच्यासह भाजपचे स्थानिक ज्येष्ठ नगरसेवक रोहिदास पाटील, मदन सिंह व कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. तेथे माहितीसाठी डिजिटल फलक लावला आहे. त्या डिजिटल फलकावर हे काम आमदार जैन यांच्या निधीतून केल्याचा मजकूर आहे. मात्र, या डिजिटल फलकावर शनिवारी रात्री आक्षेपार्ह मजकूर झळकू लागला. त्याची माहिती आमदार जैन यांना मिळताच त्यांच्या स्वीय सहायक राजेश बारखडे यांच्यामार्फत नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मिलिंद देसाई यांना लेखी तक्रार दिली आहे. त्यानुसार तपास सुरू केला आहे.

लोकमत पृ.भाग नं.३

# डॉक्टरसह त्याच्या मुलास मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईदर पश्चिमेकडील 'देवसृष्टी' बंगल्यात राहणारे डॉ. राजेश कोरडिया व त्यांचा मुलगा असीम यांना डोंगरी भागात दोघांनी मारहाण केल्याची घटना रविवारी घडली. डॉ. कोरडिया हे असीम याच्याबरोबर उत्तन वेलंकनी येथील त्यांच्या फार्म हाऊसवरून गाडीने परत येत होते. डोंगरी पोलिस चेकपोस्ट आधी बसस्थानकजवळ एका दुचाकीवरून दोघेजण आले आणि त्यांनी दुचाकी कोरडिया यांच्या मोटारसमोर आडवी घातली. दोघेही शिवीगाळ, दमदाटी करू लागले.

एकजण कोरडिया यांना जवळच्या पोलिस चौकीत चला सांगून ओढून नेऊ लागला, तर दुसऱ्याने असीम यांना ठोश्या-बुक्क्याने मारहाण करून रक्तबंबाळ केले. डॉ. कोरडिया मुलाला वाचवण्यास गेले असता त्यांच्या डोळ्यावर, नाकावर मारून जखमी करण्यात आले. उत्तन सागरी पोलिसांनी नितीन चारनिया व मंगेश कनगुटकर विरोधात गुन्हा दाखल केला.

लोकमत पृ.भाग नं.३

# पैसे देण्यास नकार दिल्याने मारहाण

मीरा रोड: भाईदरच्या उत्तन भागात २० रुपये उसने मागितले असता ते देण्यास नकार दिल्याने पैसे मागणाऱ्याने एकास मारहाण करत डोक्यात दगड मारून जखमी केल्याची घटना घडली. मूळचे उत्तर प्रदेशचे राहणारे जिलाजी गौतम (५०) हे उत्तनच्या नवीखाडी येथे राहतात. लहान बोट घेऊन मासेमारी करतात. उत्तन नाका येथे गौतम असताना मंगेश गुप्ता या परिचिताने २० रुपये मागितले. गौतम यांनी पैसे नाहीत सांगितल्यावर गुप्ता याने त्यांना धक्काबुक्की, दमदाटी व शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच बाजूला पडलेल्या दगडाने गौतम यांच्या डोक्यावर मारून जखमी केले. उत्तन सागरी पोलिसांनी गुप्तावर शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

(७५) लोकमत पृ.५/१ नं २ दि. २०/१२/२२

# पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष, तर सर्वसामान्यांचे काय?

## ब्लॅकस्पॉटमुळे जाताहेत नाहक बळी : सरकारी यंत्रणांचे दुर्लक्ष

**धीरज परब**

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या हद्दीतून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील मुंबई-अहमदाबाद महामार्ग, राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारातील घोडबंदर मार्ग, तर महापालिका हद्दीतील काशिमीरा नाक्यापासून थेट उत्तनपर्यंत जाणारा प्रमुख मार्ग महापालिकेच्या अखत्यारीत येतो. राष्ट्रीय महामार्ग व घोडबंदर मार्गावर सर्वात जास्त अपघाती ब्लॅक स्पॉट आहेत. बेशिस्त वाहनचालक, महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक विभाग पोलिसांच्या सूचना डावलत असल्याने ही ठिकाणे लोकांसाठी मृत्यूचे सापळे बनले आहेत.

तीन-चार पदरी रस्ते असल्याने वेगाने वाहन कुठून येईल, याचा नेम नसतो. हे ब्लॅक स्पॉट निश्चित होऊनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महापालिकेसह राजकारण्यांनी लोकांच्या जीवाचा विचारच केला नाही हे सत्य आहे. एरव्ही विकासकामांचे श्रेय घेण्यास धडपडणारे राजकारणी असो व प्रशासन, रस्ते ओलांडताना नागरिकांच्या जाणाऱ्या जीवाची जबाबदारी घेणार नाहीत.



### मीरा-भाईंदरमध्ये सात ब्लॅक स्पॉट

मीरा-भाईंदर हद्दीतून दहिसर चेकनाका ते वरसावे नाक्यादरम्यान राष्ट्रीय महामार्ग जातो. महामार्गावर तीन ब्लॅक स्पॉट आहेत. वरसावेनाका ते काजूपाडादरम्यान घोडबंदर महामार्ग जातो, त्यावर दोन ब्लॅक स्पॉट आहे. तर काशिमीरानाका ते उत्तन असा महापालिका अखत्यारीतील राज्यमार्ग आहे. त्यावर दोन ब्लॅक स्पॉट आहेत.

### ११ महिन्यांत सात अपघाती मृत्यू

चालू वर्षात मुंबई-अहमदाबाद महामार्गावर झालेल्या अपघातांत चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर घोडबंदर मार्गावर तीन जणांचा मृत्यू झाला आहे. प्राण्यांचेही जीव गेले आहेत. महामार्गावरील घोडबंदर खिंड भागात रस्ता ओलांडणाऱ्या अनेक बिबट्यांचे बळी वाहनचालकांनी घेतले आहेत.

### या ठिकाणी वाहन जपून चालवा

काजूपाडा, चेणे, घोडबंदर खिंड, दारास ढाबा ते पाली व्हिलेज हॉटेल, पांडुरंगवाडी ते मीरा गावठाण, हाटकेश, प्लेझंट पार्क.

### पोलिसांच्या सूचनांना खो

वाहनचालकांना वेग मर्यादा घालून दिल्या असून वाहतुकीचे नियम माहिती असतानाही त्याचे उल्लंघन केले जाते. वाहने वेगात असल्याने वाहनचालकांवर स्वतः थांबून कारवाई करणे धोक्याचे असूनही पोलिसांनी कारवाईचे प्रमाण वाढवले आहे.

### पोलिसांच्या सूचना

मीरा-भाईंदर पोलिसांनी वाहने हळू चालवा, वेगमर्यादा ३० किलोमीटर/ प्रति तास ठेवा, पुढे अपघाती क्षेत्र आहे आदी सूचना दिलेल्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व महापालिकेस झेब्रा क्रॉसिंग, रम्बलर बसविणे, वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड आकारण्यासाठी स्वयंचलित कॅमेरे बसवणे, वळणाची व उताराची तीव्रता कमी करणे व पादचारी पूल आणि अंडरपास बनवण्याच्या सूचना दिल्यात.

ब्लॅक स्पॉटवर होणारे अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी करण्यात पोलिसांना यश आले आहे. पण, अपघाती मृत्यू शून्यावर आणायचे आहेत. त्यासाठी वाहनचालकांनी शिस्त पाळणे आवश्यक आहे. बेशिस्त चालकांवर कारवाई करून यंदा १८०० चालकांचे परवाने निलंबित केले आहेत. संबंधित विभागांना पादचारी पूल, अंडरपास तसेच आवश्यक तांत्रिक बदल आदी उपाययोजना करण्यास विनंती केलेली आहे.

- रमेश भामे, वरिष्ठ निरीक्षक, वाहतूक शाखा, मीरा-भाईंदर

